# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 04.09.2025** **वार- गुरुवार**

---

**पंचायतराजअभियान**

भारताचा आत्मा खेड्यांत आहे; खेडी समृद्ध झाली तर देश आपोआप समृद्ध होईल, असं प्रतिपादन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज पुण्यात केलं. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. राज्य शासनाने यंदाच्या वर्षासाठी जिल्हा वार्षिक नियोजनाखाली २२ हजार कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे; त्यातील मोठा हिस्सा जिल्हा परिषदेमार्फत थेट गावपातळीपर्यंत पोहोचतो. ग्रामपंचायतींनी हा निधी पारदर्शक आणि सुयोग्य पद्धतीने वापरून गावांचा सर्वांगीण विकास साधावा, अशी सूचना पवार यांनी केली. कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, खासदार मेधा कुलकर्णी, यांच्यासह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते. येत्या १६ सप्टेंबरपासून पुढचे १०० दिवस मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान राबविण्यात येणार आहे. या अभियानाद्वारे प्रत्येक गावाने स्वतःचा विकास आराखडा तयार करून त्याची अंमलबजावणी करणं अपेक्षित आहे. शासनाने या अभियानासाठी २४५ कोटी रुपयांची बक्षीस योजना आखली असल्याचं अजित पवार यांनी सांगितलं.

**प्रभागरचना**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या प्रारूप प्रभाग रचनेबाबत हरकती आणि सूचना नोंदवण्याचा आजचा शेवटचा दिवस आहे. आज दुपारपर्यंत केवळ 44 हरकती नोंदवण्यात आल्या आहेत. महापालिकेने प्रारूप प्रभाग रचनेचा संपूर्ण आराखडा संकेतस्थळावर उपलब्ध करून दिला आहे.

**<u>गणेशदर्शन</u>**

राज्य शासनाच्या पर्यटन विभागाच्या वतीने आयोजित ग्लोबल गणेश फेस्टिवलअंतर्गत ज्येष्ठ, दिव्यांगांसाठी 'गणेश दर्शन' सहलीचं आयोजन करण्यात आलं होतं. सोमवार आणि बुधवार असे दोन दिवस ही गणेश दर्शन सहल काढण्यात आली; यात ३०० ते ३५० ज्येष्ठ आणि दिव्यांग नागरिकांनी सहभाग नोंदवला. शनिवारवाडा, कसबा गणपाती, भाऊसाहेब रंगारी गणपती, तांबडी जोगेश्वरी, गुरुजी तालीम, तुळशीबाग, दगडूशेठ हलवाई आणि अखिल मंडई गणपती असा या सहलीचा मार्ग होता. राज्याचे पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांनी  या गणेश दर्शन सहलीला भेट देऊन ज्येष्ठ आणि दिव्यांग नागरिकांशी संवाद साधला.

**<u>विसर्जनआरोग्यविभाग</u>**

दरम्यान गणेशोत्सवाच्या निमित्तानं पुणे आणि परिसरात उत्साहाचं वातावरण आहे. दहा दिवसांच्या या चैतन्य पर्वाची अनंत चतुर्दशीला, म्हणजे येत्या शनिवारी सांगता होणार आहे. पुणे पोलिसांनी गणेश विसर्जन मिरवणूकीचं वेळापत्रक जाहीर केलं असून सकाळी साडेनऊ वाजता मानाच्या गणपतींची मिरवणूक सुरू होईल. अनंत चतुर्दशीच्या दिवशी पुण्यातील वाहतुकीतही बदल करण्यात येणार आहेत. विसर्जन मिरवणुकीमुळे शिवाजी रस्ता, बाजीराव रस्ता, आणि लक्ष्मी रस्त्यासह अन्य रस्ते वाहतुकीसाठी बंद करण्यात येणार असल्याचं वाहतूक विभागानं कळवलं आहे.

पुण्यातील विसर्जन मिरवणूक बघण्यासाठी भाविकांची मोठी गर्दी होते; त्या पार्श्वभूमीवर पुणे महापालिकेच्या आरोग्य विभागानेही तयारी केली आहे. विसर्जन मार्ग आणि घाटांवर डॉक्टर, आरोग्य कर्मचारी सज्ज ठेवण्यात येणार आहेत. महापालिकेची १५ वैद्यकीय पथकं, सुमारे ८० डॉक्टर आणि २०० आरोग्य कर्मचारी तैनात असतील. शहरातील विविध भागात १०८ क्रमांकाच्या आणि महापालिकेच्या अशा एकंदर ३० रुग्णवाहिका तैनात असतील, कोणतीही आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास त्वरित मदत मिळावी, यासाठी विशेष आरोग्य यंत्रणा कार्यरत असेल, असं आरोग्य प्रमुख डॉ. नीना बोराडे यांनी सांगितलं.

**<u>विद्यापीठ</u>**

विद्यापीठांची राष्ट्रीय संस्थात्मक क्रमवारी आज जाहीर करण्यात आली. यात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, विद्यापीठांच्या श्रेणीत 56व्या आणि सार्वजनिक राज्य विद्यापीठांमध्ये 11व्या स्थानावर आहे. क्रमवारीत झालेल्या या घसरणीकडे विद्यापीठ प्रशासनाने लक्ष वेधलं असून आपली कामगिरी सुधारण्यासाठी कटिबद्धता दर्शवली आहे.

**<u>रस्तारुंदीकरण</u>**

पुणे महापालिकेनं कात्रज-कोंढवा रस्त्याच्या रुंदीकरणाचं काम हाती घेतलं आहे. पहिल्या टप्प्यात ५० मीटर रुंदीच्या रस्त्याच्या भूसंपादनासाठी आवश्यक ४७० कोटी रुपयांचा निधी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे उपलब्ध करून दिला आहे. त्यामुळे या रस्त्याच्या भूसंपादनाला गती येणार असल्याची माहिती महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी दिली. कात्रज-कोंढवा रस्त्याच्या कामाला ३१ ऑक्टोबर २०१८ रोजी मान्यता मिळाली आहे. दीर्घकाळ रेंगाळलेल्या या रस्त्याची रुंदी ८४ ऐवजी ५० मीटर करण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे; त्यामुळे भूसंपादनाचा खर्च कमी झाला आहे.

**<u>ई-पीकपाहणी</u>**

केंद्र शासनाच्या आधारभूत किंमत खरेदी योजनेचा लाभ घेण्याकरिता सर्व शेतकऱ्यांनी आपल्या पिकांची ई-पीक पाहणी शासनाने दिलेल्या कालावधीत पूर्ण करावी, असं आवाहन कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती संजय काळे आणि सचिव रूपेश कवडे यांनी केलं आहे. केंद्र शासनाने निश्चित केलेल्या आधारभूत दरानुसार नाफेड आणि एनसीसीएफच्या वतीने पणन महासंघामार्फत राज्यात कडधान्य, तेलबिया यांची खरेदी करण्यात येणार आहे. यासाठी ई-पीक पाहणी असलेला सात बारा उतारा आवश्यक आहे.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज अंशतः ढगाळ हवामान होतं. आज कमाल तापमान 28 तर किमान तापमान 21 पूर्णांक 7 दशांश अंश सेल्सियस नोंदवलं गेलं. उद्या शहर परिसरात हलक्या पावसाचा अंदाज असून घाट परिसरात तुरळक ठिकाणी मुसळधार पावसाचा इशारा पुणे वेधशाळेनं दिला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**